पोलिसांच्या सुरक्षिततेसाठी आता सॅनिटायझर मशीन.....

आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचा उपक्रम.

महानगर भाजपाने केले लोकार्पण.

महापौर कंचरलावार आणि जिल्हाध्यक्ष डॉ.गुलवाडे यांची उपस्थिती

चंद्रपूर येथील शहर पोलीस स्टेशन येथे आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या वतीने आज (३१जुलै) शुक्रवारला स्वयंचलित सॅनिटायझर मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहे.या मशीन चे लोकार्पण महापौर राखी कंचरलावार यांचे हस्ते करण्यात आले.

महानगर, भारतीय जनता पार्टी,चंद्रपुरच्या वतीने आयोजित या छोटेखानी लोकार्पण सोहळ्यात भाजपा जिल्हाध्यक्ष (महानगर)डॉ मंगेश गुलवाडे,भाजयुमो महानगर ,जिल्हाअध्यक्ष विशाल निंबाळकर,भाजपा नेते प्रकाश धारणे,ऍड सुरेश तालेवार,नगरसेवक सुभाष कासंगोट्टूवार,पोलीस निरीक्षक सी व्ही बहाद्दूरे,प्रशांत विघ्नेश्वर,प्रज्वलंत कडू,सूरज पेदुलवार,रामकुमार आकापेलिवार,अमीन शेख, यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

यावेळी राखी कंचरलावार म्हणाल्या,पोलीस सुरक्षित तर समाज सुरक्षित.पोलीस,हा लढा प्रत्यक्ष समोर येऊन कोरोनाशी  लढा देत आहे.अनेक पोलिसबंधु संक्रमित झाले,त्यामुळे पोलीस व त्यांचा परिवार सुरक्षित रहावा म्हणून प्रारंभी सॅनिटायझर, मास्क,आरोग्य तपासणीचे उपक्रम आ सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्यावतीने राबविण्यात आले.आता विषयाचे गांभीर्य ओळखून आ.मुनगंटीवार यांनी  स्वयंचलीत सॅनिटायझर मशीन उपलब्ध करून दिली,त्याचे रीतसर लोकार्पण झाले अशी घोषणा त्यांनी केली.

या प्रसंगी डॉ मंगेश गुलवाडे यांनी, अश्या स्वयंचलित सॅनिटायझर मशीन महानगरातील सर्व पोलीस स्टेशन ला लावण्यात येणार असल्याचे जाहीर केले.आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या जन्मदिना निमित्य सेवा सप्ताह सुरू असून ५ ऑगस्ट पर्यंत असे नवनवीन उपक्रम घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पो नि बहाद्दूरे,प्रकाश धारणे,विशाल निंबाळकर यांनी समयोचित मार्गदर्शन केले.संचालन प्रशांत विघ्नेश्वर यांनी केले तर ऍड तालेवार यांनी आभार मानले.कार्यक्रमाला राहुल पाल,स्नेहीत लांजेवार,मयूर चहारे, पियुष राऊत, पुरुषोत्तम सहारे, पवन ढवळे यांचेसह पोलीस कर्मचारिवृंदची उपस्थिती होती.